**<u>ठळक बातम्या</u>**

- अयोध्येतल्या श्रीराममंदिरात ध्वजारोहण सोहळा प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत संपन्न

- नवीन कामगार कायद्यांमुळे ७७ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण होऊन बेरोजगारीत १ पूर्णांक ३ दशांश टक्केपर्यंत घट होईल, असा भारतीय स्टेट बँकेचा अंदाज

- ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडू नका, अशी सर्वोच्च न्यायालयाची सूचना

**आणि**

- गुवाहाटी कसोटी क्रिकेट सामन्यात दक्षिण अफ्रिकेचा डाव ५ बाद २६० वर घोषित

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत आज अयोध्येमधल्या राम मंदिरावर धर्मध्वजारोहण झालं. राममंदिराचं बांधकाम पूर्ण झाल्यानिमित्त हे ध्वजारोहण करण्यात आलं आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**----व्हीसी----**

*(विवाह पंचमीच्या मुहुर्तावर होत असलेल्या धर्मध्वज सोहळ्यानिमित्त देशभरातून हजारो भाविक अयोध्यानगरीत जमले असून सर्वत्र जय श्रीरामचा जयघोष आणि शंखध्वनी ऐकू येत आहे. यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सकाळी अयोध्येत रोड शो केला आणि राम मंदिर परिसरातल्या विविध मंदिरांना भेट देऊन तिथे पूजा केली. प्रधानमंत्र्यानी सप्तमंदिर, शेषावतार मंदिर तसंच अन्नपूर्णा देवीच्या मंदिराला भेट दिली तसंच रामलल्लाच्या गर्भगृहात पूजा केली. त्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत धर्म ध्वजारोहण झालं. उगवता सूर्य आणि*

*कोविदार वृक्षासह ओम ची प्रतिमा असलेला हा भगवा ध्वज दहा फूट उंच, वीस फूट लांब असून श्रीरामाचं शौर्य आणि अलौकिक तेजाचं प्रतीक मानला जात आहे.)*

**धर्मध्वजारोहणाच्या** या सोहळ्यानिमित्त अयोध्यानगरी आज भारताच्या सांस्कृतिक जाणिवेच्या सर्वोच्च क्षणाची साक्षीदार बनली असून संपूर्ण देश आज राममय झाला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यावेळी केलं. हा धर्मध्वज भारतीय संस्कृतीच्या पुनर्जागरणाचा ध्वज असून येणाऱ्या पिढ्यांना हा श्रीरामांची शिकवण देत राहील, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**- - होल्ड बाईट मोदी - -**

प्रधानमंत्र्यांनी सर्वांना धर्मध्वज सोहळ्याच्या शुभेच्छा दिल्या. तसंच अयोध्येतील राम मंदिराच्या निर्माणासाठी ज्यांनी योगदान दिलं त्यांचं अभिनंदन केलं. प्रभु श्रीराम यांनी अयोध्येतून आपल्या जीवनाला सुरुवात केली. सर्वसामान्य माणूस मर्यादा पुरुषोत्तम बनू शकतो हे अयोध्येमुळेच समजलं. आदर्श मूल्यांना आचरणात आणण्याची शिकवण इथूनच मिळते असं प्रधानमंत्री म्हणाले. रामाकडून प्रेरणा घेऊन येणाऱ्या पिढ्यांसाठी देशाचा पाया भक्कम करण्याचा संकल्प यावेळी प्रधानमंत्र्यांनी केला. तसंच मेकॉलेने सुरू केलेल्या शिक्षण व्यवस्थेत येत्या दहा वर्षात आमूलाग्र परिवर्तन घडवण्याचा पुनरूच्चार केला. यावेळी उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ इतर मान्यवर आणि शेकडो भाविकजन उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतीय नौदल  आणि तटरक्षक दलाचं प्रत्येक नवीन जहाज पूर्णपणे भारतात तयार होत असून देशाच्या आत्मनिर्भरतेचं प्रतीक असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज समुद्र उत्कर्ष परिसंवादात ते बोलत होते. देशाचा ९५ टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो असं त्यांनी सांगितलं. भारतीय गोद्यांमधे आता बहुउद्देशीय जहाजंही तयार होत आहेत असं सांगून ते म्हणाले की,

हिंद -प्रशांत महासागर क्षेत्रात जहाजांचा आसरा आणि दुरुस्तीचं केंद्र भारतात व्हावं, असं उद्दिष्ट आहे.

**- - - होल्ड - राजनाथ सिंग - -**

**<><><><><>**

नवीन कामगार कायद्यांमुळे ७७ लाख अतिरिक्त रोजगार निर्माण होऊन बेरोजगारीत १ पूर्णांक ३ दशांश टक्क्यांपर्यंत घट होईल, असा अंदाज भारतीय स्टेट बँकेच्या एका अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. २१ नोव्हेंबरपासून लागू झालेल्या या कायद्यांमुळं संघटित कामगारांचं प्रमाण किमान १५ टक्क्यांनी वाढून सुमारे साडे ७५ टक्क्यांपर्यंत जाईल. आजघडीला हे प्रमाण ६० पूर्णांक ४ दशांश टक्के असल्याचा अंदाज आहे. सध्या देशभरात असंघटित क्षेत्रातल्या कामगारांची संख्या सुमारे ४४ कोटी इतकी असून त्यापैकी जवळपास ३१ कोटी कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केली आहे. नव्या कामगार कायद्यांमुळे या कामगारांना मिळणारं सामाजिक सुरक्षा कवच पुढच्या २ ते ३ वर्षांमध्ये ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे.

**<><><><><>**

मंजुरी मिळण्यातले अडथळे कमी करण्यासाठी आणि कागदपत्रं सुटसुटीत करण्यासाठी २९ कामगार कायदे चार कामगार संहितामधे समाविष्ट केल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियूष गोयल यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं नॅशनल ट्रेड लीडर परिषदेत ते आज बोलत होते. नवीन कामगार संहितांमुळे कामगारांना किमान वेतनाची हमी, गिग कामगारांना सामाजिक सुरक्षा मिळेल असं गोयल म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्था आणि राज्य सरकारच्या पातळीवर व्यापाऱ्यांसाठी एकल परवाना पद्धत सुरू करण्याचाही सरकार विचार करत आहे, असं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यातल्या ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अद्याप जाहीर झालेल्या नाहीत, तिथं आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडू नका, अशी सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज निवडणूक आयोगाला केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जात असल्याप्रकरणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठासमोर आज सुनावणी झाली. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाशी चर्चा सुरू असल्याची माहिती राज्य सरकारनं सर्वोच्च न्यायालयाला दिली. त्यानंतर पीठानं या प्रकरणाची सुनावणी शुक्रवारपर्यंत पुढे ढकलली. २ डिसेंबर रोजी होणाऱ्या २४२ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांमध्ये ५७ संस्थांमध्ये आरक्षणाची कमाल मर्यादा ओलांडली जात असल्याची माहिती निवडणूक आयोगाचे वकील बलबीर सिंह यांनी दिली. त्यावर, या प्रकरणाच्या निकालावर हे अतिरिक्त आरक्षण अवलंबून असेल, अशी तोंडी टिप्पणी सरन्यायाधीशांनी केली.

**<><><><><>**

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकींसाठी निवडणूक आयोगाने तयार केलेल्या प्रारूप मतदार यादीवर हरकती आणि सूचना देण्यासाठी दिलेली ७ दिवसांची मुदत वाढवून १५ दिवसांची करण्याची मागणी प्रदेश काँग्रेसने केली आहे. या संबंधी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि विधान परिषद गटनेते सतेज पाटील यांनी निवडणूक आयोगाला आज संयुक्त पत्र लिहिलं असल्याची माहिती प्रदेश काँग्रेसने प्रसिद्धीपत्रकात दिली आहे.

**<><><><><>**

हमारा संविधान - हमारा स्वाभिमान ही उद्या देशभरात साजऱ्या होणाऱ्या संविधान दिनाची संकल्पना आहे. नवी दिल्लीतल्या संविधान सदनात मुख्य

समारंभ होणार असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, अनेक केंद्रीय मंत्री आणि खासदार यावेळी उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

गुरू तेग बहादूर यांच्या साडेतीनशेव्या जयंतीनिमित्त वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्या

त येत आहेत.

याप्रसंगी ते विशेष नाणं आणि टपाल तिकीटाचं अनावरण करणार आहेत. गुरू तेग बहादूर यांच्या साडेतीनशेव्या जयंतीनिमित्त या वर्षी नांदेड इथं आज यानिमित्त  रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं आहे. या शिबिरात मोठ्या संख्येने दाते रक्तदान करून अभिवादन करत आहेत.

**<><><><>**

राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना अर्थात एनपीएस अंतर्गत येणारे पात्र कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांना एकात्मिक निवृत्तीवेतन योजना म्हणजेच यूपीएस स्वीकारण्यासाठी ३० नोव्हेंबर ही शेवटची तारीख असेल, अशी माहिती अर्थमंत्रालयानं दिली आहे. यासाठी त्यांना सीआरए यंत्रणेद्वारे ऑनलाईन अर्ज करता येईल, किंवा प्रत्यक्ष अर्ज स्थानिक नोडल कार्यालयात जमा करता येईल. यूपीएस अंतर्गत, योजना बदलण्याची संधी, करात सवलत, राजीनामा आणि सक्तीच्या निवृत्तीचे फायदे असे अनेक लाभ कर्मचाऱ्यांना मिळतात. ते मिळवण्यासाठी केंद्र सरकारचे सर्व पात्र कर्मचारी आणि निवृत्तीवेतनधारकांनी वेळेवर अर्ज करावा, असं आवाहन मंत्रालयानं केलं आहे.

**<><><><>**

गोव्यात सुरू असलेल्या ५६व्या इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज दिवंगत अभिनेता धर्मेंद्र यांना आदरांजली वाहण्यात आली. प्रसिद्ध दिग्दर्शक राहुल रवैल यांनी धर्मेंद्र यांच्या काही आठवणींना उजाळा दिला. धर्मेंद्र यांच्या निर्मिती संस्थेत तयार झालेल्या ‘बेताब’ या चित्रपटाचं दिग्दर्शन राहुल रवैल यांनी केलं होतं.

इफ्फीत आज चित्रपट निर्माते जिगर नागदा यांचा द व्हिस्पर्स ऑफ द माउंटन्स हा चित्रपट दाखवण्यात आला. राजस्थानमध्ये राजसमंद आणि उदयपूर इथे या चित्रपटाचं चित्रीकरण झालं असून पर्यावरणविषयक जबाबदारी आणि विकासाच्या प्रश्नांवर बेतलेली पितापुत्राची कथा या चित्रपटात दाखवण्यात आली आहे.

**<><><><><>**

गुवाहाटी इथं बरसापारा स्टेडियमवर भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात सुरु असलेल्या दुसऱ्या  कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेने ५ बाद २६० धावांवर डाव घोषित केला आहे. भारताचे फलंदाज यशस्वी जैस्वाल आणि के एल राहुल आता मैदानात उतरले असून भारताला सामना जिंकण्यासाठी ५५० धावांचं आव्हान पूर्ण करायचं आहे.

//<><><><><>//